**मे. ग्रेटा एनर्जी लिमिटेड, ३४, बालाजी नगर, पहिला रस्ता, रोहापेठ्ठा, जि. चेन्नई, तामिळनाडु-६०० ०१४ यांच्या प्लॉट नं. बी-१ व एएम-१, म.औ.वि.मंडळ भद्रावती, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर येथे त्यांच्या प्रस्तावित ग्रीनफील्ड प्रकल्पात पेलेट प्लांट (१२,००,००० टन प्रति वर्ष), कोळसा गॅसिफिकेशन युनिट (सिन गॅस ६२६४० एनएम3/तास), सल्फर रिकव्हरी युनिट (२३०० टन प्रति वर्ष), गॅस आधारित डीआरआय प्लांट (स्पाँज आयर्न- ४,९५,००० टन प्रति वर्ष), ६५ टन - एलआरएफ आणि ६५ टन - व्हीडी (बिलेट्स – ४,२२,९५० टन प्रति वर्ष), रोलिंग मिल (टीएमटी रिबार्स आणि वायर रॉड्स – ४,००,००० टन प्रति वर्ष) आणि वीट उत्पादन युनिट (१०,००० विटा प्रति दिवस) प्रकल्प उभारण्याच्या प्रस्तावाबाबत पर्यावरणविषयक जनसुनावणीचे इतिवृत्त**

---

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | २८/०५/२०२५ |
| वेळ | : | सकाळी ११:०० वाजता |
| स्थळ | : | प्लॉट नं. बी-१ व एएम-१, म.औ.वि.मंडळ भद्रावती, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर. |

**<u>प्रस्तावना:-</u>**

मे. ग्रेटा एनर्जी लिमिटेड, ३४, बालाजी नगर, पहिला रस्ता, रोहापेठ्ठा, जि. चेन्नई, तामिळनाडु-६०० ०१४ यांच्या प्लॉट नं. बी-१ व एएम-१, म.औ.वि.मंडळ भद्रावती, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर येथे त्यांच्या प्रस्तावित ग्रीनफील्ड प्रकल्पात पेलेट प्लांट (१२,००,००० टन प्रति वर्ष), कोळसा गॅसिफिकेशन युनिट (सिन गॅस ६२६४० एनएम३/तास), सल्फर रिकव्हरी युनिट (२३०० टन प्रति वर्ष), गॅस आधारित डीआरआय प्लांट (स्पाँज आयर्न- ४,९५,००० टन प्रति वर्ष), ६५ टन - एलआरएफ आणि ६५ टन - व्हीडी (बिलेट्स - ४,२२,९५० टन प्रति वर्ष), रोलिंग मिल (टीएमटी रिबार्स आणि वायर रॉड्स -४,००,००० टन प्रति वर्ष) आणि वीट उत्पादन युनिट (१०,००० विटा प्रति दिवस) प्रकल्पाच्या उभारणीबाबतच्या प्रस्तावाबाबत पर्यावरण विषयक जनसुनावणी प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण अनुमती (Environment Clearance) प्राप्त करण्यासाठी आवश्यक असलेला प्रकल्प स्थानाच्या परिघातील १०.० कि.मी. परिघातील पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल (EIA) तयार करण्यासाठी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांनी टीओआर (TOR) दिनांक ०७ ऑक्टोबर, २०२४ रोजी मान्यता दिलेली आहे.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार प्रकल्प स्थानाच्या १० कि.मी. परिघातील पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत पर्यावरण जाहिर जनसुनावणी आयोजित करणे व त्यात प्रकल्पग्रस्त, स्थानिक लोक यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी उपस्थित केलेले पर्यावरणीय मुद्दे अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात समाविष्ट करण्याचे निर्देश दिले. तसेच सदरहू प्रकल्प हा संवर्ग ए-३ (अ) मध्ये मोडत असून पर्यावरण अनुमती ही पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्याकडून प्राप्त करणे आवश्यक आहे.

मे. ग्रेटा एनर्जी लिमिटेड, ३४, बालाजी नगर, पहिला रस्ता, रोहापेट्टा, जि. चेन्नई, तामिळनाडु-६०० ०१४ यांनी पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे दिनांक २८/०२/२०२५ रोजी अर्ज सादर केला. म.प्र.नि.मंडळ चंद्रपूर व जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या समन्वयाने जिल्हाधिकारी चंद्रपूर, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक २८ मे, २०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता प्रत्यक्ष (physical) आणि पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यास मान्यता दिली. त्याचप्रमाणे सदरहू जनसुनावणी ऑनलाईन घेण्याचीही सूचना केली.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बैठकीच्या ३० दिवस अगोदर जाहिर जनसुनावणीची सूचना एक स्थानिक वृत्तपत्रात स्थानिक भाषेत व एक राष्ट्रीय वृत्तपत्रात इंग्रजीमध्ये प्रकाशित करणे बंधनकारक असल्याने उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ चंद्रपूर यांनी स्थानिक वृत्तपत्र लोकमत, नागपूर एडिशन यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र द टाईम्स ऑफ इंडीया, नागपूर यात इंग्रजीत दिनांक २६/०४/२०२५ रोजी जाहिर सूचना प्रकाशित केलेली होती. त्यात ऑनलाईन जनसुनावणीसाठीचा बैठक नंबर व बैठक पासवर्ड उपलब्ध करण्यात आलेला होता. त्यात नियोजित प्रकल्पामुळे परिसरातील रहिवाशी, पर्यावरणविषयक कार्यरत संस्था, सदर प्रकल्पामुळे विस्थापित होणारे रहिवाशी किंवा सदर प्रकल्पामुळे अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवाशी यांना सदर प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक, विचार, टीकाटिप्पणी, सूचना किंवा आक्षेप जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून जनसुनावणीच्या तारखेपर्यंत स्थानिक चंद्रपूर कार्यालयात लेखी वा ईमेलव्दारे सादर करण्याचे आवाहन करण्यात आलेले होते. त्यानुसार उप प्रादेशिक कार्यालय, चंद्रपूर यांनी एक लेखी आक्षेप प्राप्त झालेला आहे.

या प्रकल्पाबाबत तयार करण्यात आलेला प्रारुप पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांश अहवाल इंग्रजी व मराठीत खालील अधिसूचित कार्यालयात नागरिकांच्या अवलोकनार्थ व माहितीसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेला होता:-

१. पर्यावरण विभाग, १५ वा मजला, नवीन प्रशासकिय भवन, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
२. सह-संचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पाईंट, २ रा व ४ था माळा, सिनेप्लानेट सिनेमा समोर, सायन सर्कल जवळ (पु) मुंबई - ४०० ०२२.
३. प्रादेशिक कार्यालय, नवीन सचिवालय बिल्डींग, वने, पर्यावरण व वातावरण बदल मंत्रालय, व्हीसीए समोर, सिव्हिल लाईन्स, नागपूर.
४. प्रादेशिक कार्यालय/ उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर.
५. जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर.
६. जिल्हा परिषद, चंद्रपूर.
७. जिल्हा उद्योग केंद्र, चंद्रपूर.
८. उप-विभागीय कार्यालय, चंद्रपूर, ता. जि. चंद्रपूर.
९. तहसिल कार्यालय, चंद्रपूर, ता. जि. चंद्रपूर.

१०. नगर परिषद कार्यालय, भद्रावती, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर.
११. गट-ग्रामपंचायत कार्यालय, चारगांव (तेलवासा व चारगांव), ता. भद्रावती, जि. चंद्रपूर.
१२. ग्रामपंचायत कार्यालय, ढोरवासा, ता.भद्रावती, जि. चंद्रपूर.
१३. ग्राम पंचायत कार्यालय, पिपरी, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर.
१४. गट-ग्राम पंचायत कार्यालय, घोनाड (कोच्ची व घोनाड), ता. भद्रावती, जि. चंद्रपूर.
१५. गट-ग्राम पंचायत कार्यालय, चिरादेवी (चिरादेवी व गोरजा), ता. भद्रावती, जि. चंद्रपूर.
१६. ग्राम पंचायत कार्यालय, किन्हाळा, ता. भद्रवती, जि. चंद्रपूर.
१७. गट-ग्राम पंचायत कार्यालय, पिंपळगांव (पिंपळगांव व जुनाळा), ता. वणी, जि. यवतमाळ.
१८. ग्रामपंचायत कार्यालय, उकणी, ता. वणी, जि. यवतमाळ.
१९. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे संकेतस्थळ:- www.mpcb.gov.in

वरिल अनुक्रमांक ०५ ते १९ वर नमुद अधिसुचित शासनाच्या विभागांनादेखील त्यांनी त्यांच्या स्तरावर सदरहू पर्यावरणविषयक जनसुनावणीबाबत व्यापक प्रसिध्दी देण्याबाबत कळविण्यात आलेले होते. अशा प्रकारे जाहिर जनसुनावणीबाबत अधिसुचनेमध्ये नमुद केलेल्या पध्दतीचा अवलंब करुन व्यापक स्वरुपात प्रसिध्दी देण्यात आली, जेणेकरुन प्रकल्पबाधित किंवा संबंधित व्यक्तींना त्यांचे विचार, टीकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप संबंधित विभागास नोंदविणे सोईचे होईल.

पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ च्या पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेनुसार सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी कार्यालयीन आदेश ई-३८/२०२५ व्दारा पत्र क्रं. बीओ/जेडी (डब्ल्युपीसी) पीएच/बी-२५०५१५-एफटीएस-०११८ दिनांक १५/०५/२०२५ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित करण्यात आली होती:-

| | | |
|---|---|---|
| १) जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर किंवा त्यांचे प्रतिनिधी (अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जाचा नसावा) | - | **अध्यक्ष** |
| २) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचे प्रतिनिधी - प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर | - | **सदस्य** |
| ३) उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर | - | **समन्वयक** |

या कार्यालयास उपरोक्त प्रकल्पाबाबत ०९ सूचना, तक्रारी, निवेदने, आक्षेप प्राप्त झालेले असून संबंधित व्यक्ती/संस्था यांना जनसुनावणीस उपस्थित राहून त्यांच्या सूचना सूचना, तक्रारी, निवेदने, आक्षेप उपस्थित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

जनसुनावणी दरम्यान उपस्थितांचे हजेरीपट तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर जाहिर जनसुनावणी घेण्यासाठी गठित केलेल्या समितीचा आदेश सहपत्र-२ व ३ प्रमाणे सोबत जोडलेले आहेत.

**<u>जनसुनावणीचे इतिवृत्तः-</u>**

जनसुनावणीच्या सुरवातीस श्री. उमाशंकर भादुले, उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर तथा समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी डॉ. नितीन व्यवहारे, अपर जिल्हादंडाधिकारी चंद्रपूर तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री. संजय दे. पाटील, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ. चंद्रपूर तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्पाचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरण क्षेत्रातील कार्यरत विविध संस्था व मोठया संख्येने उपस्थित स्थानिक यांचे स्वागत करुन जनसुनावणीच्या कार्यपध्दतीबद्दल माहिती दिली. त्यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणविषयक सूचना, विचार, आक्षेप उपस्थित करण्याचे आवाहन केले.

समन्वयक यांनी सांगितले की सदरहू समिती ही उपस्थितांचे प्रस्तावित प्रकल्पाविषयीचे पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप नोंदविण्यासाठी असून सदरहू समितीस प्रकल्पास मंजूरी देणे, नाकारणे वा शिफारस करण्याचा अधिकार नाही. बैठकीत उपस्थितांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेपांची नोंद घेण्यात येऊन त्याचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येऊन ते अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, प्राप्त झालेल्या लेखी सूचना यांच्यासह अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, म.प्र.नि.मंडळ ह्याच्या तर्फे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना सादर करण्यात येते. तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते.

त्यांनी सांगितले की अधिसूचनेतील तरतुदींनुसार सदरहू बैठकीचे छायाचित्रिकरण व व्हिडीओ शुटींग करण्यात येत असून सादरीकरणानंतर उपस्थितांना आपले प्रश्न, सूचना, विचार, आक्षेप शांतपणे मांडावेत. त्यास प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार किंवा प्रकल्प प्रवर्तक उत्तर देतील. प्रश्न विचारताना प्रथम आपले संपूर्ण नांव व गाव सांगण्यात यावे.

समन्वयक यांनी अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांना प्रस्तावित प्रकल्पाचे पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत (Environment Management Plan) सादरीकरण करण्याची सूचना केली.

प्रकल्प अधिकारी यांनी प्रकल्पाचे विस्तारिकरण व पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत (Environment Management Plan) व इतर सादरीकरण मराठी भाषेत केले. सादरीकरणात प्रामुख्याने खालील बाबी स्पष्ट करण्यात आल्या:-

- प्रकल्पाबाबतची सविस्तर माहिती
- प्रकल्पाचे क्षेत्रफळ, अक्षांश-रेखांश, नकाशा, बुडित क्षेत्र, लाभक्षेत्र, वन क्षेत्र, प्रकल्पाचे वैशिष्ट्ये, प्रकल्पाचे महत्व, परिणाम, जमीन वापर, भूकंप स्थिरता,
- प्रकल्पाचा उद्देश, सामाजिक स्थिती, रोजगाराची संधी, शेतक-यांच्या प्रकल्पामुळे होणारा विकास,
- प्रकल्पाचे विश्लेषण, सारांश, निष्कर्ष
- सामाजिक व आर्थिक स्थितीचे विश्लेषण
- हवा, पाणी, जमीन, ध्वनी, विस्थापन इ.बाबतची माहिती,
- नियोजित प्रकल्पामुळे हवा,पाणी,विस्थापन,जैवविविधता यावर होणारे परिणाम व व्यवस्थापन
- प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर केले जाणारे पर्यावरण व्यवस्थापन याबाबतची माहिती
- इतर पर्यावरण व्यवस्थापन विषयीची माहिती

समन्वयक यांनी उपस्थितांना त्यांचे प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्पाविषयी काही विचार, टीकाटिप्पणी, सूचना किंवा आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले. सदरहू जनसुनावणी ही पर्यावरणविषयक असल्याने पर्यावरणविषयकच प्रश्न उपस्थित करण्याची व सूचना, आक्षेप नोंदविताना प्रथम आपले संपूर्ण नांव व गाव सांगण्याची सूचना केली.

**जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीकाटिप्पणी, आक्षेप, सूचना तसेच प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार/ पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने खालीलप्रमाणे:-**

**१) श्री. मधुकर रामचंद्र सावरकर, तालुका अध्यक्ष, भाजपा किसान आघाडी, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनी प्रशासनाने या क्षेत्रामध्ये एकही न्यायालयीन खटला दाखला नाही याबाबत खोटी माहिती दिलेली आहे. कंपनीने मान्य करावे की या क्षेत्राशी संबंधित खटले न्यायप्रविष्ट असल्याचे मान्य करावे. कंपनीने साखरवाही तलावाचे सर्वेक्षण केले असल्याचे | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | सांगितले. परंतु कोळसा खाणीने ५० एकर जागा घेतलेली होती. सदर ५० एकर जागेतून कोळशाचे उत्खनन होणार होते. सदर परिसरात १५० फुटावर कोळसा असल्याचे निदर्शनास येते. या क्षेत्रात खाण सुरू झाली होती परंतु काही कारणास्तव ती खाण बंद करण्यात आली आहे. सीएसआर निधीच्या माध्यमातून आरोग्य विषयक सोई सुविधा पूरविणे हे कंपनीचे कर्तव्य आहे. आरोग्य विषयक सुविधा पूरविण्यात आल्याचे खोटे वक्तव्य करून स्थानिकांची दिशाभूल येथे करण्यात येत आहे. कंपनीच्या स्थापनेपूर्वी सांगण्यात आले की येथे जवळपास ८००० रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार होती. परंतु आज येथे फक्त ५००-५५० रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असे सांगून परिसरातील गावांची फसवणूक करण्यात येत आहे. कंपनीने येथे संरक्षण भिंत उभारले आहे त्यामुळे धूळीचे उत्सर्जन होत आहे. याच प्रकारचा प्रकल्प एमआयडीसी चंद्रपूर येथे प्रकल्प अस्तित्वात असून त्यामुळे आजु-बाजूच्या शेती नष्ट झालेले आहेत व तेथे शेती करणे अवघड झालेले आहे. त्यामुळे भविष्यात या क्षेत्रात देखील तसेच घडणार असल्याने कंपनीने शेतकऱ्यांसोबत करार करून प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना नूकसान भरपाई द्यावी. प्रकल्पापासून ०.५ किमी अंतरावर तेलवासा, १.० किमी अंतरावर पिपरी व १.५ किमी अंतरावर ढोरवासा गाव स्थित आहेत. सदर प्रकल्पामुळे या गावांमध्ये धुळीची प्रादूर्भाव होणार आहे. सद्य:स्थितीत परिसरातील कोळसा खाणींमधून मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत आहे. प्रस्तावित प्रकल्पातून लोह खनिजाचे डस्ट किती निर्माण होईल व त्याचा परिणाम काय होईल याबाबत कंपनीने लेखी स्वरूपात कळवावे. प्रकल्पामुळे शेतकऱ्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम झाल्यास त्याचा संपूर्ण खर्च कंपनीने करावा व याबाबत कंपनीने शेतकऱ्यांसोबत लेखी करार करावे. | |

## २) श्री. भालचंद्र धनराज बदखल, ढोरवासा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | ढोरवासा हे गाव प्रकल्पापासून १-१.५ किमी अंतरावर स्थित आहे. सादरीकरणादरम्यान कंपनीने सांगितले की त्यांनी सीएसआर निधीच्या माध्यमातून तेलवासा, पिपरी गावामध्ये सामाजिक उपक्रम राबविले आहेत. परंतु कंपनीने ढोरवासा गावाला विश्वासात घेऊन एकही सामाजिक कार्य केलेले नाहीत. त्यामुळे माझा प्रश्न आहे की ढोरवासा गाव या कंपनीमुळे प्रभावित होणार नाही काय? कंपनीने ढोरवासा गावामध्ये घेतलेल्या आरोग्य शिबीरांची संख्या सांगावी. प्रकल्पाच्या समोर ढोरवासा गावातील शेती अस्तित्वात असून जवळपास ९-१० शेतकऱ्यांची एकूण ४०-५० एकर शेती संपादित करण्यात आली आहे. कंपनीमुळे भविष्यात मोठ्या प्रमाणात प्रदूषण होणार आहे. त्यामुळे ढोरवासा गाव देखील प्रभावित होणार आहे हे नाकारता येणार नाही. त्यामुळे कंपनी ढोरवासा गावाला दत्तक घेणार आहे किंवा कसे तसेच आरोग्य विषयक घेण्यात येणाऱ्या शिबीरांची संख्या सांगण्यात यावी. तसेच गावातील नागरीकांना रोजगार उपलब्ध देणार आहे किंवा कसे याबाबत माहिती देण्यात यावी. प्रकल्पाच्या प्रदूषणाचे होणाऱ्या शेतीच्या नूकसानीकरिता नूकसान भरपाई देणार आहे किंवा कसे याबाबत देखील माहिती देण्यात यावी. कंपनीने परिसरातील सर्व गावांना सोबत घेऊन प्रकल्प कार्यान्वित करावा. कंपनीने ढोरवासा गावाला विश्वासात घेतले नाही परंतु कंपनी त्यांचे कार्य साध्य करण्यासाठी ढोरवासा गावात ये-जा करत आहेत. त्यामुळे कंपनीने ढोरवासा गावाला दत्तक घ्यावे व तेथे विकासकामे करावीत. तसेच गावातील स्थानिकांच्या आरोग्या विषयी चांगले निर्णय घ्यावे अशी प्रकल्प प्रवर्तकांना विनंती आहे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

३) <u>श्री. राजेश बेले, संसथापक अध्यक्ष, संजीवनी पर्यावरण सामाजिक संस्था, ता. जि. चंद्रपूर:-</u>

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | या परिसरात मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत असून त्याचा परिणाम नागरीकांच्या आरोग्यावर होत आहे. याबाबत उत्तर कोण देणार? जिल्हा परिषदेकडून प्राप्त अहवालानूसार सन २०२३-२४ मध्ये माजरी गावामध्ये १३१३, मानोरा गावामध्ये १८८, चंदनखेडा गावामध्ये १९१७ नागरीक प्रदूषणाने ग्रस्त आहेत. तसेच सन २०२४-२५ मध्ये माजरी गावामध्ये १२९०, घोडपेठ गावामध्ये ७२०, चंदनखेडा गावामध्ये ८४१ व भद्रावती मध्ये १०८८ नागरीक प्रदूषणाने ग्रस्त असल्याचे दिसून येते. असे असताना देखील चंद्रपूर जिल्ह्यातील भद्रावती तालुक्यामध्ये स्पॉंज आयर्न उद्योग लादण्यात येत आहे. हा चंद्रपूरच्या नागरीकांवर अन्याय आहे. कंपनीने ५१.० हेक्टर जूमीन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून घेतली असल्याचे सांगितले आहे. परंतु त्यांच्या पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये ४३.० हेक्टर जमीन नमूद आहे. भद्रावती तालुक्यातील नागरीकांना खोटी माहिती देऊन त्यांची दिशाभूल करण्याचे काम येथे सुरू आहे. म.प्र.नि. मंडळाच्या संकेतस्थळावर कार्यकारी सारांश अहवालाची इंग्रजी भाषेची प्रत प्रकाशित करण्यात आली आहे. परंतु स्थानिकांना इंग्रजी भाषेचे ज्ञान नसल्याने त्यांना त्यामधील काहीही समजलेले नाही. याबाबत वारंवार तक्रार करून देखील मराठी भाषेत कार्यकारी सारांश अहवालाची प्रत प्रकाशित का करण्यात येत नाही? तसेच पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालाची प्रत देखील इंग्रजी भाषेत प्रकाशित करण्यात येते परंतु महाराष्ट्र राज्याची मातृभाषा मराठीमध्ये का प्रकाशित करण्यात येत नाही? याच प्रकल्पाचा मुल येथे वीज निर्मिती प्रकल्प अस्तित्वात आहे. सदर वीज प्रकल्पावर करण्यात आलेल्या कार्यवाहीचे विवरण या प्रकल्पाच्या | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | अहवालात नमूद का करण्यात येत नाही? सदर प्रकल्पामुळे स्थानिक नागरीकांना आरोग्य विषयक समस्या येत आहेत, तसेच वन्य प्राणी, जल प्राणी यांच्या आरोग्याला धोका निर्माण झालेला आहे. याबाबत न्याय मिळत नाही. सदर जनसुनावणी पर्यावरण विषयक असताना सीएसआर निधीबाबत येथे सांगण्यात येत असून पर्यावरण विषयावर कोणतेही भाष्य करण्यात येत नाही. मा. जिल्हाधिकारी साहेबांचा प्रथम पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला परंतु त्यांनी प्रदूषणावर कोणत्याही प्रकारच्या उपाययोजना केलेल्या नाहीत. मा. जिल्हाधिकारी हे जिल्हा पर्यावरण समितीचे अध्यक्ष असून त्यांनी जिल्हा पर्यावरण समितीची बैठक घेतलेली नाही. कोणत्याही पर्यावरण विषयक संस्थेसोबत चर्चा केलेली नाही. स्थानिक शेतकऱ्यांची जमीन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने सन १९९४ मध्ये निप्पॉन डेंड्रो प्रकल्पासाठी संपादित केली होती परंतु सदर प्रकल्प उभारण्यात आला नाही. सदर प्रकल्पा कार्यान्वित झाला असता तर आज या क्षेत्रातील हजारो नागरीकांना रोजगार मिळाला असता. सन १९९४ मध्ये १२०००-१३००० रूपयांमध्ये संपादित केलेली जमीन आज ग्रेटा एनर्जी या प्रकल्पाला देण्यात येत असल्याने स्थानिकांवर अन्याय होत आहे. याच परिसरामध्ये अरविंदो खाणीला स्थानिक नागरीकांचा विरोध असून देखील सदर खाणीला पर्यावरण विषयक मंजूरी देण्यात आली आहे. भारत सरकारच्या पर्यावरण विभागामध्ये मराठी भाषेचे ज्ञान असलेली तज्ञ व्यक्ति असणे कायद्याने बंधनकारक आहे. परंतु तेथे या प्रकारची व्यक्ति नसल्याचे समतजे. म.औ.वि.मंडळाने जमीन संपादित करताना पोलिस यंत्रणेचा वापर केला, त्याची कारणे काय आहेत. सदर संपादन प्रक्रिया न्यायप्रविष्ट असल्याने महाराष्ट्र शासनाने या प्रस्तावित प्रकल्पास स्थगिती का दिली नाही. मा. जिल्हाधिकारी, तहसिलदार व उपविभागीय अधिकारी यांनी त्याबाबत शासनाकडे अहवाल सादर का केला नाही. स्थानिक शेतकऱ्यांना न्याय मिळेपर्यंत | |

| | | |
|---|---|---|
| | या प्रकल्पास स्थगिती देण्यात यावी अशी माझी मागणी आहे. तसेच प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर यांच्यावर देखील निलंबनाची कार्यवाही करण्यात यावी ही देखील आमची मागणी आहे. | |

४) **श्री. बापू वाघुजी सोयाम, भद्रावती, ता. भद्रवती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सदर जमीन म.औ.वि. मंडळाने स्थानिक नागरीकांकडून संपादित केली परंतु स्थानिक प्रशासन, महाराष्ट्र शासन यांच्यासमवेत वारंवार बैठका घेऊन देखील आमच्या मागण्या पूर्ण झालेल्या नाहीत. स्थानिकांना न अनुदान देण्यात येते न नौकरी देण्यात येते मात्र उद्योगांना परवानगी देण्यात येते. भविष्यात शेतकऱ्यांचे भलं होत नसेल तर कंपन्यांचं देखील भलं होणार नाही. सर्वप्रथम स्थानिकांच्या समस्यांचे निराकरण करण्यात आले पाहिजे. एमआयडीसीला तुम्हा सुचित करायला हवे की स्थानिकांच्या समस्या सोडविल्याशिवाय आम्ही कंपनी उभारू शकत नाही. स्थानिकांवर छोट्या गोष्टींसाठी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. मी एक आदिवासी शेतकरी आहे. परंतु माझ्याकडे जमीन नाही. केंद्र सरकारच्या अधिनियमानूसार माझ्याकडे शेतजमीन असणे आवश्यक आहे. जवळपास ३०० शेतकरी भूमीहीन झालेले आहेत परंतु त्यांचा प्रश्न सुटलेला नाही. आम्ही मा. जिल्हाधिकारी, मंत्री महोदयांसोबत बैठका घेतलेल्या आहेत परंतु आमच्या समस्यांचे निराकरण झालेले नाही. उद्योगांच्या समस्या मात्र तात्काळ सोडविण्यात येतात. जवळपास ८ गाव तुमच्या प्रकल्पामुळे बाधित होणार आहेत. परंतु येथे फक्त २ गावांबाबत सांगण्यात येत आहे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

## ५) श्री. नागेश्वर बापूरावजी बदखल, ढोरवासा, ता. भद्रवती, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सर्वप्रथम ज्या शेतकऱ्यांच्या जमीनी संपादित करण्यात आल्या आहेत त्यांचे प्रश्न सोडविण्यात यावेत. शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविल्यानंतरच प्रकल्प कार्यान्वित करावा. ढोरवासा गावाकडे कंपनीने दुर्लक्ष केले आहे. प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर परिसरातील शेतकऱ्यांच्या शेतपिकांचे नूकसान होणार आहे. त्याबाबत कंपनीच्या उपाययोजना काय असणार आहे याची माहिती देण्यात यावी. कंपनी कार्यान्वित झाल्यानंतर प्रदूषणामुळे स्थानिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होणार आहे. त्याबाबत कंपनी कोणत्या उपाययोजना करणार आहेत याची माहिती देण्यात यावी. प्रकल्पामुळे भूजलाचे पाणी देखील प्रदूषित होणार असल्याने त्यावर करण्यात येणाऱ्या उपाययोजनांबद्दल माहिती देण्यात यावी. कंपनीच्या लगतच्या क्षेत्रातील तेलवासा, ढोरवासा, जुना कुनाडा या कोळसा खाणी बंद करण्यात आलेल्या आहेत. त्या क्षेत्रामध्ये वाघ, अस्वल, हरीण, मोर यासारख्या प्राण्यांचा वावर आहे. त्यांचे देखील नूकसान न होण्याबद्दल कंपनीने काळजी घ्यावी. तसेच याबाबत करण्यात येणाऱ्या उपाययोजनांबाबत कंपनीने ग्रामपंचयातीला लेखी स्वरूपात द्यावे ही आमची मागणी आहे. कंपनीने आरोग्य विषयक करार प्रत्येक प्रकल्पग्रस्त गावासोबत करावा. एमआयडीसीने ढोरवासा गावातील ५२ टक्के जमीन संपादित केली आहे व त्यापैकी काही जमीन ग्रेटा कंपनीला देण्यात आली आहे. ढोरवासा गावातील उर्वरित १२ टक्के जमीन एमआयडीसीने अधिग्रहीत करावी. प्रशासनाला आमच्या गावाला पूराचा सामना करावा लागत असल्यामुळे ढोरवासा गावाचे पुनर्वसन करण्याबाबत वारंवार निवेदने देण्यात आली आहेत. तसेच ढोरवासा गावातील रहिवाशांना योग्य तो मोबदला देण्याबाबत वारंवार विनंती करण्यात येत | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | असून प्रशासन देखील आमच्या मागणीकडे दुर्लक्ष करत आहेत. कंपनी प्रशासनाला विनंती आहे की त्यांनी याबाबत देखील लेखी स्वरूपात माहिती द्यावी. कंपनी प्रशासनाने यापुढे करण्यात येणाऱ्या प्रत्येक गोष्टीबाबत प्रकल्पग्रस्त ग्रामपंचायतींना लेखी स्वरूपात माहिती द्यावी. कंपनीने ५००-५५० रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असल्याचे सांगितले आहे. न्युएरा कंपनीप्रमाणे या कंपनीने देखील एक इमेल तयार करावा व त्यावर स्थानिक बेरोजगारांचे बायोडाटा मागवावा व त्यांना त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनूसार रोजगार द्यावा. तसेच रोजगारामध्ये स्थानिक प्रकल्पग्रस्त शेतकरी व गावकऱ्यांना प्राधान्य द्यावे. नौकरी कायमस्वरूपी व कंत्राटी तत्त्वावर असणार याबाबत देखील माहिती देण्यात यावी. | |

६) **<u>श्री. प्रविण नत्थुजी सातपुते, भाजपा तालुकाध्यक्ष तथा निप्पॉन डेन्ड्रो प्रकल्पग्रस्त समिती अध्यक्ष, ता. भद्रवती, जि. चंद्रपूर:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | येथे पर्यावरण विषयक जनसुनावणी घेण्यात येत आहे परंतु मागील ३०-३२ वर्षांपासून स्थानिक शेतकऱ्यांच्या लढ्याबद्दल विचार केला आहे काय? मा. जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना आमच्या वारंवार याबाबत निवेदने देण्यात आली आहेत परंतु त्याबाबत निर्णय घेण्यात येत नाही. प्रस्तावित प्रकल्पाच्या अधिकाऱ्यांसोबत चर्चा करायला गेले असता आमच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करण्यात येत असून पोलिस संरक्षणात काम करण्यात येत आहे. तसेच स्थानिकांवर अवास्तव गुन्हे दाखल करण्यात येत आहे. कंपनी व स्थानिकांमध्ये चांगले संबंध प्रस्थापित झाल्यावरच कंपनीचे काम सुरळीत पार पडणार असे आम्हा शेतकऱ्यांना वाटते. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने निप्पॉन डेन्ड्रो प्रकल्पासाठी आमच्या जमीनी संपादित केल्या. निप्पॉन डेन्ड्रो | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | प्रकल्प कार्यान्वित व्हायला पाहिजे होता. प्रकल्प कार्यान्वित झाला नसल्याने म.औ.वि. मंडळाने आमच्या जमीनी आमच्या शेतकऱ्यांना परत करायला पाहिजे होत्या. परंतु तसे करण्यात आले नाही. त्यानंतर आम्ही स्थानिकांनी त्या शेतीवर शेती करून आमची उपजिविका कमावली व आज या ठिकाणी नवीन प्रकल्पासाठी पर्यावरण विषयक जनसुनावणी घेण्यात येत आहे. शेतकऱ्यांच्या भविष्याबाबत कंपनीने विचार करायला हवा होता. प्रकल्पाच्या पुढच्या क्षेत्रात वे.को.लिची जमीन अस्तित्वात आहे. त्याठिकाणी वाघ, बिबट व इतर प्राणी अस्तित्वात आहेत. त्याची वन विभागाकडे देखील नोंदणी आहे. कंपनीने वन विभागाकडून त्याचा अहवाल प्राप्त करायला पाहिजे होता. सदर कंपनीने हरीत पट्टा जरी निर्माण केला तरी आम्हा स्थानिकांना प्रदूषणाचा त्रास होणार आहे. कंपनी प्रशासनाने स्थानिक बेरोजगार मुलांना व भूमीहीन शेतकऱ्यांना रोजगारात समाविष्ट केले पाहिजे अशी मी शेतकऱ्यांच्या वतीने मागणी करतो. तसेच जोपर्यंत शेतकऱ्यांच्या मागण्या पूर्ण होत नाही तोपर्यंत कंपनीने या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे काम करू नये अशी त्यांना विनंती आहे. एकदा आम्ही कारागृहात गेलेलो आहे, यापुढेही आमची तयारी आहे. मा. जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी आम्हाला शांतता बाळगण्याची विनंती केली आहे व आमच्या समस्या सोडविण्याचे आश्वासन दिले आहे परंतु आम्ही शांत बसणार नाही. मा. जिल्हाधिकारी महोदयांना आम्ही वारंवार निवेदने दिली आहेत परंतु ते दुर्लक्ष करत आहेत. आमच्या सहनशक्तीची पराकाष्ठा पाहू नका अन्यथा उद्रेक होईल. कंपनीने जी जागा घेतली त्या परिसरातील स्थानिकांना रोजगारात प्राधान्य द्यावे. न्युएरा कंपनीप्रमाणे आपणाकडे अर्ज सादर करताना चालु ईमेल द्यावा. कंपनीने प्रकल्पग्रस्त गावांमधील बेरोजगार युवकांशी संपर्क साधून त्यांचे बायोडेटा घ्यावा व त्यांना नौकरीमध्ये सामावून घेण्याचे प्रयत्न करावेत. | |

७) <u>श्री. दिपक भारतसिंग दिक्षीत, अध्यक्ष, प्रकृती फाऊंडेशन, ता. जि. चंद्रपूर:-</u>

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सदर जनसुनावणी पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसुचना, २००६ नूसार आयोजित करण्यात आली आहे. पर्यावरण, वने व वातावरणीय बदल विभाग यांनी जारी केलेल्या टीओआर नूसार पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये साहित्यिक चोरीबाबतचा अहवाल सोबत जोडणे बंधनकारक आहे. परंतु पर्यावरण सल्लागार यांनी ती प्रत या अहवालात जोडलेली नाही. त्यामुळे माझा कंपनीवर आरोप आहे की त्यांनी सादर केलेला पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल पूर्णपणे खोटा आहे. माझी मा. अध्यक्ष यांना विनंती आहे की त्यांनी पर्यावरण सल्लागार यांना याबाबत स्पष्टीकरण देण्याचे आदेश करावे. कंपनीने त्याबाबत चेकलिस्ट का नाही लावली याचे उत्तर पर्यावरण सल्लागार यांनी द्यावे. पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालयाच्या नियमाप्रमाणे प्रारूप अहवालात देखील सदर चेकलिस्ट लावणे आवश्यक आहे. | अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या सर्व मुद्यांची नोंद जनसुनावणीच्या ईतिवृत्तामध्ये नोंद घेण्यात येत आहे.<br><br>प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, जनसुनावणी दरम्यान सादर करण्यात आलेला पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल हा प्रारूप अहवाल आहे. अंतिम अहवाल पर्यावरण आघात मुल्यांकन समितीच्या पुढे सादर करताना त्यामध्ये साहित्यिक चोरीबाबतचा अहवाल सोबत जोडण्यात येईल.<br><br>पर्यावरण सल्लागाराने सांगितले की, साहित्यिक चोरीबाबतची चेकलिस्ट जनसुनावणीच्या ईतिवृत्तासोबत अंतिम अहवाल सादर करताना जोडण्यात येईल.<br><br>अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी नागरीकांना शांतता बाळगण्याचे आवाहन केले. त्यांनी सांगितले की, पर्यावरण विषयक जनसुनावणीची चित्रीकरण करण्यात येत असून ईतिवृत्तामध्ये जनसुनावणीदरम्यान उपस्थित करण्यात येणाऱ्या सर्व मुद्यांची नोंद घेण्यात येईल. |
| | २.५ मध्ये यांनी सांगितले आहे की सीन गॅसची निर्मिती करणार असून त्याचा प्रकल्पामध्ये वापर होणार आहे. या घातक गॅसच्या गळतीमुळे होणाऱ्या अपघाताबाबात उपाययोजना पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये नमूद केलेली नाही. भविष्यात बॉयलरमध्ये अपघात झाल्यास परिसरातील ८-१० गावांमध्ये भोपळ गॅस अपघातासारखी | अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या सर्व मुद्यांची नोंद जनसुनावणीच्या ईतिवृत्तामध्ये नोंद घेण्यात येत आहे.<br><br>प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, प्रकल्प उभारत असताना सर्व प्रकारच्या सुरक्षेच्या |

| | | |
|---|---|---|
| | परिस्थिती निर्माण होऊ शकते. त्यामुळे परिसरात मोठ्या प्रमाणात जीवित हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याबाबत पर्यावरण सल्लागाराने सुरक्षेच्या दृष्टीकोणातून कोणत्याही उपाययोजना पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये नमूद केलेले नाहीत. अशाच प्रकारची घटना १५ वर्षांपूर्वी स्टील अथॉरिटी ऑफ इंडीया यांच्या मूल रोडवर स्थित प्रकल्पात घडलेली असून त्याचे परिणाम आजपर्यंत तेथील स्थानिकांवर होत आहे. जनसुनावणीदरम्यान उपस्थित केलेल्या मुद्यांवर प्रकल्प प्रवर्तक किंवा पर्यावरण सल्लागाराने उत्तर देणे अपेक्षित आहे. मी येथे तांत्रिक गोष्टींवर प्रश्न उपस्थित करत आहे तर मला उत्तरे अपेक्षित आहे. पर्यावरण सल्लागार कंपनीला १०-२० लाख रूपये मिळाले असतील तेव्हाच त्यांनी पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार केलेला आहे. पर्यावरण सल्लागार समाजसेवा करण्यासाठी हैदराबाद येथून या ठिकाणी आलेले नाहीत. पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करणाऱ्या पर्यावरण सल्लागाराने जनसुनावणीदरम्यान उपस्थित प्रश्नांची उत्तरे देणे अपेक्षित आहे. कंपनीचा या ठिकाणी कोणताही संबंधि नाही. त्यामुळे मा. अध्यक्ष यांना विनंती आहे की त्यांनी पर्यावरण सल्लागाराला उत्तरे देण्याचे आदेश द्यावे. परिसराच्या नजिकच्या १० गावांच्या जीवन मरणाचा प्रश्न असल्याने या अहवालात सुरक्षेबाबतच्या उपाययोजनांचा समावेश होणे बंधनकारक आहे. पर्यावरण सल्लागाराने या अहवालात सुरक्षेबाबतच्या उपाययोजनांचा समावेश केलेला आहे किंवा नाही याबाबत उत्तरे द्यावी. | उपाययोजना केल्यानंतरच प्रकल्प कार्यान्वित केला जाईल व त्याबाबत अंतिम अहवाल सादर करताना आपण उपस्थित केलेल्या सर्व प्रकारच्या त्रुटी पूर्ण करण्यात येईल. सदर मुद्दा नागरीकांच्या सुरक्षेबाबत असून त्याबाबत योग्य त्या उपाययोजना करण्यात येतील. कोणतेही उपकरणाचे डिझाईन तयार करतेवेळी त्यामध्ये काही सुरक्षा वैशिष्ट्ये असतात. सुरक्षा वैशिष्ट्यांची पूर्तता केल्याशिवाय सदर उपकरणास उभारण्याची मान्यता मिळत नाही. सदर प्रकल्प स्टील प्लांट असल्याने गॅसिफायरच्या सुरक्षा वैशिष्ट्यांची पूर्तता केल्याशिवाय त्याच्या डिझाईनला मान्यता मिळत नाही. या सर्व गोष्टींचा समावेश अंतिम अहवालामध्ये करण्यात येईल. |
| | पर्यावरण, वने व वातावरणीय बदल विभागाने आपणांस टीओआर दिलेला आहे. त्यानूसार कंपनीने पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार केलेला आहे. परंतु त्या अहवालामध्ये बॅकअप प्लान देणे बंधनकारक असताना देखील त्याचा कुठेही उल्लेख केलेला नाही. प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर अपघात झाल्यास व जनतेचे नूकसान झाल्यावर त्याची | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सर्व प्रकारच्या प्रतिबंधात्मक उपयांचा समावेश पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात करण्यात येईल. डायरेक्टर ऑफ बॉयलर यांच्याकडून अनुमती मिळाल्यानंतरच सदर प्रकल्पात बॉयलर चालवण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | नूकसान भरपाई करण्याबाबत कोणत्या उपाययोजनांचा समावेश पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात करण्यात आलेला नाही. | |
| | ३.७ परिशिष्टमध्ये परिसरातील ४० गावांमध्ये सर्वेक्षण केल्याचे विवरण देण्यात आले आहेत. पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालयाचे नियमांमध्ये काय नमूद आहे याची माहिती देण्यात यावी. माझ्या माहिती प्रमाणे पर्यावरण सल्लागाराने गावांमध्ये सर्वेक्षण करतेवेळी कमीत कमी ३० टक्के लोकांसोबत संपर्क साधून प्रश्नावली देऊन त्यावर गावकऱ्यांचे मत नोंदविणे गरजेचे आहे. याबाबतचे पुरावे कंपनीने जनसुनावणीदरम्यान सादर करावे. परंतु तसे काही करण्यात आले नाही. तसेच त्याचे जिओ टॅग केलेले फोटो जोडण्यात आलेले नाहीत व प्रश्नावली देखील जोडण्यात आलेली नाही. तसेच जनतेला सदर प्रश्नावली मिळालेली नाही त्यामुळे सदर पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल हा खोटा असल्याचा माझा आरोप आहे. तसेच जनतेच्या मते त्यांना सदर प्रश्नावली त्यांना मिळाली नाही. म्हणजेच पर्यावरण सल्लागार कंपनीने खोटे दस्ताऐवज सादर केले असल्याने त्यांच्यावर खोटे दस्तऐवज सादर केल्याप्रकरणी गुन्हा दाखल व्हायला पाहिजे. तसेच चाचेगिरीचा गुन्हा देखील दाखल व्हायला पाहिजे. तसेच म.प्र.नि. मंडळ व जिल्हाधिकारी कार्यालय जर या खोट्या दस्तऐवजावर जनसुनावणी आयोजित करत असेल तर आपण देखील या गन्ह्या पात्र ठरता. जिल्हा प्रशासन देखील वादाच्या भोवऱ्यात अडकू शकते. पर्यावरण सल्लागाराने सदर प्रश्नावली जनसुनावणीदरम्यान सादर करावी. मा. अध्यक्षांची सदर कंपनी दिशाभूल करत आहे. कृपया याची नोंद घेण्यात यावी. | पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की, प्रकल्पाच्या १० कि.मी परिघातातील गावांचा सर्वेक्षण करणे बंधनकारक आहे. पसिरातील गावांमध्ये चर्चा करून त्याचा अहवाल सोबत जोडणे. जिओ टॅग केलेले फोटो अंतिम अहवालासोबत पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालयाकडे सादर करण्यात येईल. सदर प्रश्नावलीबाबत नागरीकांकडून तोंडी उत्तरे घेण्यात येतात. |
| | ४.२२ नूसार पर्यावरण सल्लागाराने प्रकल्पाच्या १० किमी परिघामध्ये जोखीम मुल्यांकन, हवा व पाण्याचे नमूने गोळा करून त्याचा परिसरात होणारा परिणाम याबाबत मान्यताप्राप्त सॉफ्टवेअर मधून अभ्यास केलेला आहे काय. केले असल्यास त्याचे प्रमाणपत्र | पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की, आपण उपस्थित केलेल्या मुद्यांवर योग्य ती कार्यवाही करून पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय यांचेकडे अंतिम अहवालासोबत प्रमाणपत्र जोडण्यात येईल. प्रकल्पाच्या १० |

| | | |
|---|---|---|
| | येथे जनसुनवणीदरम्यान सादर करावे. मा. अध्यक्ष यांना विनंती आहे की त्यांनी प्रकल्प प्रवर्तक व पर्यावरण सल्लागार यांना प्रमाणपत्र सादर करण्याबाबत निर्देशित करावे. मा. अध्यक्षांसमोर सदर अहवाल खोटा असल्याबाबत पुरावे सादर करत आहे. जर पर्यावरण सल्लागार पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत गरजेचे असणारे सर्व प्रकारचे प्रमाणपत्र सादर करत नसेल तर त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा व सदर जनसुनावणी रद्द करण्यात यावी. याची संपूर्ण जबाबदारी मा. अध्यक्ष पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांची आहे. आम्ही याबाबत न्यायालयात दाद मागणार आहोत व त्यामध्ये सर्वप्रथम मा. जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना प्रथम प्रतिवादी बनविणार आहोत. त्यामध्ये सर्व आरोप मा. जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्यावर होणार आहेत कारण कंपनी स्थानिक प्रशासनाची दिशाभूल करत आहे. | किमी परिघामध्ये जोखीम मुल्यांकन, हवा व पाण्याचे नमूने गोळा करून त्याचा अहवाल सोबत जोडण्यात आला आहे. |
| | सदर अहवालातील चॅप्टर क्रं. १२ मध्ये पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या नियमानूसार हवा गुणवत्ता तपासणी करणाऱ्या तज्ञ व्यक्तिचे नांव, भ्रमणध्वनी क्रमांक, नाबेट मान्यता प्रमाणपत्र सोबत जोडणे बंधनकारक आहे. तसेच जोखीम मुल्यांकन अहवालामध्ये देखील तज्ञ व्यक्तिचे नांव, भ्रमणध्वनी क्रमांक, नाबेट मान्यता प्रमाणपत्र सोबत जोडणे बंधनकारक आहे व मा. सर्वोच्च न्यायालयाने देखील मान्यता दिलेली आहे. तसेच याबाबत पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालयाची मान्यता प्राप्त असणे गरजेचे आहे. तसेच हवा व जल प्रदूषणाबाबत देखील या सर्व गोष्टी लागू आहेत. पर्यावरण सल्लागाराने या सर्व बाबी तज्ञ व्यक्तिंकडून करवून घेतले असतील तर त्यांची नावे येथे जाहीर करावी. सदर अहवालात नांव नमूद का नाहीत. याचा अर्थ असा की कंपनीने बोगस पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल सादर केलेला आहे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये भारतीय गुणवत्ता परिषदेचे प्रमाणपत्र सोबत जोडलेले आहे. |
| | हवा गुणवत्ता तज्ञाचे नाव व भ्रमणध्वनी क्रमांक सांगण्यात यावे. त्यांच्याशी संपर्क साधून त्यांना काही | पर्यावरण सल्लागाराने सांगितले की, हवा गुणवत्ता तज्ञाचे नांव श्री. वाय महेश्वर रेड्डी |

| | | |
|---|---|---|
| | प्रश्न मला विचारायचे आहेत. सदर अहवालामध्ये त्यांचे भ्रमणध्वनी क्रमांक देखील देणे बंधनकारक आहे. जोखीम मुल्यांकन करणाऱ्या तज्ञ व्यक्तिचे नांव सांगण्यात यावे. ध्वनी प्रदूषणाबाबत मुल्यांकन करणाऱ्या तज्ञ व्यक्तिचे नांव सांगण्यात यावे. माझी मा. अध्यक्षांना विनंती आहे की त्यांनी पर्यावरण सल्लागार यांना ध्वनी प्रदूषण तज्ञ व्यक्तिचे नांव जाहीर करण्याबाबत निर्देशित करावे. माझी मागणी आहे की सर्व तज्ञांचे नांव जाहीर करावे जेणेकरून त्याची ईतिवत्तामध्ये नोंद करणे शक्य होईल. याबाबत नाबेट संस्थेला तक्रार करण्यात येईल. ॲनाकॉन लॅबॉरेटरीज बाबत तक्रार करण्यात आली होती व त्यांचे प्रमाणपत्र निलंबित करण्यात आले होते. पर्यावरण सल्लागाराने वायु गुणवत्ता तपासणी केल्याबाबतचे जिओ टॅग्ड छायाचित्र अहवालात जोडण्यात आले नाही. सदर छायाचित्र अहवालामध्ये जोडणे बंधनकारक आहे. माझा अध्यक्षांना प्रश्न आहे की आपण देखील यांच्या चुकीच्या पद्धतीमध्ये सोबत आहात किंवा आपण याबाबत कंपनीला उत्तर मागणार आहात. ज्या ग्रामपंचायतीच्या हद्दीत वायु परिक्षण करण्यात आले त्या ग्रामपंयाचतींकडून प्राप्त करण्यात आलेल्या ना-हरकत प्रमाणपत्राची प्रत जोडलेली नाही. त्यामुळे सदर अहवाल हा खोटा असलयाचे दिसते. मा. अध्यक्षांनी याबाबत पर्यावरण सल्लागार व कंपनी यांना उत्तर देण्यास निर्देशित करावे. तसेच नागरीक प्रश्न उपस्थित करत असतील तर त्याबाबत उत्तर देण्याची जबाबदारी नागरीकांच्या वतीने प्रशासनाची आहे. जर येथे तज्ञ व्यक्तिंचे नांव घोषित होत नसेल तर याबाबत स्थानिक प्रशासनावर चुकीच्या पद्धतीने जनसुनावणी घेण्यात येत असल्याबाबत आरोप करण्यात येऊ शकतात. कंपनीने उर्वरित दोन तज्ञ लोकांचे नांव सांगायला पाहिजे. तसेच गावात करण्यात आलेल्या विविध परिक्षणाचे जिओटॅग्ड छायाचित्र सादर करायला पाहिजे. तसेच ८ कि.मी अंतरावर स्थित वन क्षेत्रामध्ये अस्तित्वात असलेल्या वन्य प्राण्यांवर प्रदूषणामुळे | आहे, जोखीम मुल्यांकन करणाऱ्या तज्ञ व्यक्तिचे नाव श्री. टी. एच. पटेल आहे.<br>प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, हवा गुणवत्ता तज्ञाचा भ्रमणध्वनी क्रमांक नंतर देण्यात येईल.<br><br>मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपण उपस्थित केलेल्या मुद्यांची नोंद घेण्यात येत आहे व त्याचे छायाचित्रिकरण देखील करण्यात येत आहे. आपल्या प्रश्नांना दिलेली उत्तरे व अनुत्तरीत प्रश्नांची देखील नोंद घेण्यात येत आहे. |

| | | |
|---|---|---|
| | होणारा परिणाम व वन्य प्राणी संवर्धन आराखड्याचा समावेश पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये केलेला नाही. विजासन लेणी या पुरातन ठिकाणावर या कंपनीच्या प्रदूषणाचा काय परिणाम होईल याबाबत देखील उल्लेख केलेला नाही. मुल मध्ये अस्तित्वात असलेल्या त्यांच्या उद्योगामुळे त्या परिसरातील नागरीक त्रस्त आहेत परंतु त्याबाबत म.प्र.नि. मंडळाने कोणत्याही प्रकारची कार्यवाही केलेली नाही. तसेच कंपनीने परिसरात वृक्ष लागवड देखील केलेली नाही. कंपनीने खोटा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल सादर केलेला असल्याने सदर अहवालास रद्द करण्यात यावे. तसेच पर्यावरण सल्लागारांच्या विरोधात भारतीय दंड संहितेअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात यावा तसेच साहित्याची चोरी केल्याप्रकरणी देखील गुन्हा दाखल करण्यात यावा. याबाबत गुन्हा दाखल न झाल्यास प्रशासनाविरोधात न्यायालयात दाद मागण्यात येईल. | |

**८) श्री. आकाश मोरेश्वर जुनघरे, सरपंच, गट-ग्रामपंचायत चारगाव-तेलवासा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनीने आजपर्यंत स्थानिकांना रोजगार देण्याचे आश्वासन दिले आहे परंतु प्रत्यक्षात रोजगार दिलेला नाही. कंपनीने बाहेरच्या व्यक्तिला रोजगार दिलेला आहे. त्याबाबत विरोध केला असता कंपनीने त्या युवकाला नौकरीवरून काढून टाकण्याबाबत असमर्थता दर्शविली आहे. स्थानिकांना रोजगारात प्राधान्य का देण्यात येत नाही? रोजगार देताना किती वेतन असणार व त्यामध्ये वैद्यकीय सुविधेचा समावेश असणार किंवा नाही तसेच याबाबत करार केला आहे काय? स्थानिक प्रकल्पग्रस्तांना डावलून बाहेरच्या व्यक्तिला रोजगार कसा उपलब्ध केला? प्रकल्पग्रस्त नागरीकांना डावलून प्रकल्पग्रस्त गावाच्या बाहेरील व्यक्तिंना रोजगार देण्यात आला आहे. तेलावासा, | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सदर प्रकल्पामध्ये स्थानिकांनाच रोजगारात प्राधान्य देण्यात येईल. सद्य:स्थितीत फक्त दोन लोकांना अस्थाई तत्त्वावर नौकरी देण्यात आली आहे. स्थानिक गावांमध्ये रोजगाराबाबत माहिती देण्यात आली होती परंतु त्यास प्रतिसाद मिळाला नाही त्यामुळे या दोन व्यक्तिंना रोजगार देण्यात आला आहे. तेलवासा गावातील युवकाला नौकरी देण्यात आली आहे व भविष्यात देखील स्थानिकांना रोजगार देण्यात येईल. सदर प्रकल्पामध्ये ६०० प्रत्यक्ष रोजगार व जवळपास १००० अप्रत्यक्ष रोजगार स्थानिकांसाठी उपलब्ध होणार आहे. प्रकल्प |

| | | |
|---|---|---|
| | पिपरी व ढोरवासा गावातील युवकांना वगळून देऊळवाडा येथील युवकाला रोजगार देण्यात आला आहे. तेलवासा, पिपरी व ढारवासा गावातील युवकांना रोजगार का देण्यात नाही आला? कौशल्य विकासाबाबत प्रशिक्षण तात्काळ सुरू करण्यात यावे. ज्या व्यक्तिला कंपनीने रोजगार दिला ती व्यक्ति स्थानिकांना धमक्या देते की पूर्ण गाव विकत घेण्यात येईल. सदरील व्यक्तिला कामावरून काढणार येईल किंवा त्याला नौकरीवर ठेवण्यात येईल. या बाबत प्रकल्प प्रवर्तकांनी माहिती द्यावी. कंपनीने स्थानिकांना रोजगार द्यावा व बाहेरच्या व्यक्तिला नौकरीवरून काढावे. याबाबत कंपनीकडे वारंवार तक्रार करून देखील याबाबत कंपनी टाळाटाळ करत आहे. प्रकल्प कार्यान्वित होण्याआधीच प्रकल्पग्रस्त नागरीकांना डावलून बाहेरच्या व्यक्तिंना रोजगार देण्यात येत आहे. कंपनी व्यवस्थापनाने शेतकऱ्यांच्या मोबदल्याबाबत चर्चा केली आहे काय? आपणाकडे वारंवार याबाबत पत्र देण्यात आले आहे, त्यावर चर्चा झाली आहे काय? स्थानिकांना नौकरी देताना हमीपत्र देण्यात यावे. कंपनीने स्थानिक शेतकऱ्यांचे ट्रॅक्टर कामाला घेतले नाही. आमच्या ग्रामपंचायतीमध्ये २४ तास पाण्याची सुविधा आहे. गावातून पाणी घेऊ शकत होते परंतु त्याबाबत देखील टाळाटाळ करण्यात आली आहे. कंपनीने सीएसआर अंतर्गत मंदिराचे बांधकाम केले, शाळेची रंगरंगोटी केली. परंतु रोजगाराबाबत कंपनी काही उपाययोजना सांगत नाही. कंपनीने स्थानिकांचे ट्रॅक्टर व टँकरचा वापर करावा व स्थानिकांना त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनूसार रोजगार द्यावा. | कार्यान्वित झाल्यानंतर वैद्यकीय सुविधा व वेतनाबाबत वेळोवेळी माहिती देण्यात येईल. प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर सर्वांना कंपनीमध्ये स्थायी स्वरूपाच्या नौकऱ्या देण्यात येईल. सद्य:स्थितीत अस्थायी स्वरूपाचा रोजगार देण्यात आला आहे. स्थानिकांना रोजगारात प्राधान्य देण्यात येईल. तसेच ज्या शेतकऱ्यांमध्ये कौशल्याचा अभाव असेल अशा स्थानिकांना कौशल्य विकास कार्यक्रमाअंतर्गत प्रशिक्षण देण्यात येईल व त्यांना रोजगार देण्यात येईल. पर्यावरणीय मंजूरी मिळाल्याशिवाय पुढची प्रक्रिया करता येणार नाही. सदर प्रकल्पामध्ये २०००-३००० नागरीकांना रोजगार देण्यात येईल. स्थानिकांच्या सहकार्याशिवाय प्रकल्प कार्यान्वित करता येऊ शकत नाही. सदर प्रकल्प पुढील २५-५० वर्षांकरिता सुरू करण्यात येत आहे. त्यामुळे स्थानिकांचा विकास होईल. त्याकरिता गावकऱ्यांना थोडा संयम ठेवावा लागेल. आम्ही प्रकल्पग्रस्त गावांचा विकास करणार आहोत. स्थानिकांना विनंती आहे की ज्या युवकांना नौकरी करण्याची इच्छा त्यांनी त्यांचे बायोडाटा कंपनीकडे द्यावे. त्यांना कंपनीमध्ये नौकरी देण्यात येईल.<br>मा. अध्यक्ष यांनी सांगितले की, स्थानिकांचे बायोडाटा कंपनीने घ्यावे व नौकरीमध्ये प्राधान्य द्यावे.<br>प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सदर व्यक्तिला कंपनीतर्फे रूजु करण्यात आलेले नाही. कंपनीच्या सुरूवातीच्या काळात जनसंपर्क करण्यासाठी किंवा काही कामांची सुरूवात करण्यासाठी मनुष्यबळाची आवश्यकता असते. कंपनीतर्फे आश्वासन देण्यात येते की, प्रकल्पग्रस्त गावांचा सर्व समावेशक विकास करण्याचा मानस आहे. |

| | | |
|---|---|---|
| | | याबाबत व्यवस्थापनासोबत चर्चा करून माहिती देण्यात येईल. शेतकऱ्यांच्या जमीनीचा मुद्दा शासनाच्या अखत्यारीत येत असून एमआयडीसीने ही जमीन आम्हाला दिलेली आहे. त्याबाबतचे शुल्क कंपनीतर्फे एमआयडीसीकडे जमा करण्यात आले आहे. |

९) **श्री. प्रविण नत्थुजी सातपुते, भाजपा तालुकाध्यक्ष तथा निप्पॉन डेन्ड्रो प्रकल्पग्रस्त समिती अध्यक्ष, ता. भद्रवती, जि. चंद्रपूर:-:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनीतर्फे सांगण्यात आले की जवळपास २०००-३००० नौकऱ्या देण्यात येईल. परंतु त्या कशा पद्धतीने देण्यात येईल याची माहिती देण्यात यावी. या क्षेत्रात कार्यरत असलेल्या अरविंदो व एमटा खाणींमध्ये रू. ८०००/- ते रू. १००००/- प्रमाणे नौकऱ्या देण्यात येत आहेत. सदर प्रकल्पामध्ये कौशल्यानूसार नौकऱ्या देणार किंवा कसे याबाबत चर्चा करण्यात यावी. या परिसराची जमीन मागील ३० वर्षांपासून अधिग्रहीत करण्यात आली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना सानुग्रह अनुदान देण्यात यावे कारण येथील शेतकरी मागील ३० वर्षांपासून बेरोजगार आहे. एमआयडीसीने स्थानिकांवर अन्याय केला आहे. कंपनी स्थानिकांना सानुग्रह अनुदान देणार आहे किंवा कसे याबाबत माहिती द्यावी. स्थानिकांचा कंपनीला विरोध नाही. शेतकऱ्यांच्या नूकसान भरपाईबाबत विचारणा करत आहे. सानुग्रह अनुदान व नौकऱ्यांबाबत लेखी आश्वासन कंपनीने द्यावे. ज्या प्रकारे एमटा व अरविंदो या प्रकल्पांमध्ये स्थानिकांची हेळसांड होत आहे, तसाच प्रकार या प्रकल्पात होऊ नये हीच आमची मागणी आहे. कंपनीला विनंती आहे की जोपर्यंत शेतकऱ्यांच्या विषयाबाबत सकारात्मक निकाल येत नाही तोपर्यंत त्यांनी काम थांबवावे. शेतकऱ्यांचा फायदा होत असेल तर कंपनीला विरोध नाही. कंपनीने स्थानिक प्रकल्पग्रस्तांना नौकरीमध्ये प्राधान्य द्यावे व | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, प्रकल्पाच्या वेगवेगळ्या टप्प्यांमध्ये नौकऱ्या उपलब्ध होतील. स्थानिकांच्या त्यांच्या शैक्षणिक अर्हतेप्रमाणे व कौशल्याप्रमाणे नौकऱ्यांमध्ये सामावून घेण्यात येईल. तसेच ज्या नागरीकांमध्ये कौशल्याची कमतरता असेल अशा नागरीकांना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देऊन नौकऱ्या देण्यात येतील. सदर जमीन ३० वर्षांपूर्वी एमआयडीसीद्वारे अधिग्रहीत करण्यात आली होती. परंतु त्यानंतर या ठिकाणी एकही उद्योग आलेला नाही. त्यामुळे स्थानिकांना विनंती आहे की त्यांनी सदर प्रकल्पाला मदत करावी जेणेकरून आपणास नौकऱ्या मिळतील व परिसराचा विकास होण्यास मदत होईल. शासनासोबत गावकऱ्यांचा संवाद सुरू आहे तर शासनातर्फे याबाबत तोडगा काढण्यात येईल. नजीकच्या काळात मिळालेल्या माहितीनूसार गावकऱ्यांच्या समस्यांबाबत शासनस्तरावर सकारात्मक विचार सुरू आहे. त्यामुळे भविष्यात येणाऱ्या प्रकल्पांना सकारात्मक प्रतिसाद दिल्यास या क्षेत्राचा विकास होईल. परिसरामध्ये दळण-वळणाची साधने, शैक्षणिक व इतर सुविधा देण्यात येईल. तसेच |

| | | |
|---|---|---|
| | त्यानंतर इतर गावातील युवकांना नोकरीमध्ये प्राधान्य द्यावे. सदर प्रकल्प कार्यान्वित होण्याकरिता कमीत कमी ३-४ वर्षांचा कालावधी लागणार असल्याने कंपनीने तोपर्यंत अंशकालीन तत्त्वावर स्थानिक प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना नोकऱ्या द्याव्या. कंपनीने अतांत्रिक लोकांची यादी तयार करून त्यांना तात्काळ कौशल्य विकास प्रशिक्षण सुरू करावे. | दुय्यम व्यवसायामध्ये देखील वाढ होणार आहे. सदर प्रकल्पामुळे परिसराचा कायापालट होण्यास मदत होईल. त्यामुळे परिसरातील नागरीकांना विनंती आहे की त्यांनी या परिसरात येणाऱ्या प्रकल्पांबाबत सकारात्मक विचार करावा व त्यांचे प्रोत्साहन करावे जेणेकरून स्थानिकांचा विकास होण्यास मदत होईल. पहिल्या टप्प्यामध्ये कंपनीने दोन गावांमध्ये काम सुरू केले आहे. त्याचप्रमाणे टप्प्या-टप्प्याने परिसरातील उर्वरित गावांमध्ये संपर्क साधुन सीएसआर, आरोग्य विषयक सुविधा व रोजगाराच्या माध्यमातून काम सुरू करण्यात येईल. कंपनीचे उभारणीचे काम पुढील ६ महिन्यात सुरू होईल. त्यावेळी कंत्राटदाराला देण्यात येणाऱ्या कंत्राटामध्ये स्थानिकांना रोजगारात प्राधान्य देण्याची अट घालून देण्यात येईल. तसेच याबाबत गावकऱ्यांसोबत चर्चा देखील करण्यात येईल. कंत्राटदार स्थानिकांना त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनूसारच नौकरी देणार. तसेच परिसरातील स्थानिकांमध्ये कौशल्य तफावतीचे विश्लेषण करून त्यांना त्या प्रकारच्या कौशल्याचे प्रशिक्षण देण्यात येईल व नौकऱ्या देण्यात येतील. कोणताही उद्योग मनुष्यबळ, उपकरणे व कच्चा माल या शिवाय चालु शकत नाही. कौशल्य विकास प्रशिक्षणाकरिता गावातील अकुशल व्यक्तिंची यादी तयार करण्यात येईल व संबंधित सरपंच सोबत चर्चा करून त्याप्रमाणे योग्य तो निर्णय घेण्यात येईल. त्याकरिता पर्यावरण मंजूरी प्राप्त झाल्यानंतर किमान ०३ महिन्यांचा कालावधी स्थानिकांना आम्हाला द्यावा लागणार. त्यांनतरच नौकरीबाबतच्या प्रक्रियेस सुरूवात करण्यात येईल. |

१०) **श्री. संदिप अन्नाजी खुटेमाटे, माजी सरपंच, ग्रामपंचायत पिपरी, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | तेलवासा सरपंचांनी बाहेरच्या व्यक्तिला नौकरी दिल्याचा मुद्दा उपस्थित केला होता. परंतु स्थानिक प्रकल्पग्रस्तांना नौकरीमध्य प्राधान्य देण्यात यावे. निप्पॉन डेन्ड्रो प्रकल्पासाठी एमआयडीसीने जमीन अधिग्रहीत केली. तसेच आपण जेव्हा प्रकल्पग्रस्त ८ गावांमध्ये सर्वेक्षण केले तेव्हा आपणास शैक्षणिक अर्हता असलेली व्यक्ति आढळली नाही काय? कंपनीने बाहेरील व्यक्तिच्या रोजगाराबाबत वचनबद्ध असल्याचे सांगितले. कंपनी प्रशासनाला विनंती आहे की त्यांनी स्थानिकांना रोजगारात प्राधान्य देण्याबाबत लेखी आश्वासन द्यावे. मागे एक महिना आम्ही कंपनीविरोधात आंदोलन केले परंतु त्याठिकाणी प्रशासन, कंपनी किंवा एमआयडीसीच्या एकाही प्रतिनिधीने लक्ष दिले नाही. सदर जनसुनावणीच्या ईतिवृत्ताची प्रत आम्हाला मिळणार काय? आपणाकडून लेखी आश्वासन प्राप्त झाल्याशिवाय स्थानिकांना विश्वास बसणार नाही. मागील ०६ महिन्यांमध्ये कंपनीने स्थानिकांसाठी काय केले याबाबत माहिती द्यावी. जागेच्या सभोवताली संरक्षण भिंत उभारण्यासाठी कंपनीने स्थानिक मजूरांचा वापर न करता बाहेरून मजूर आणले. कंपनीने परिसातील गावांमध्ये मनुष्यबळ उपलब्धतेबाबत चौकशी देखील केलेली नाही. स्थानिकांचे प्रश्न मार्गी लावणे हे प्रशासनाचे काम आहे. स्थानिक प्रशासनाने मध्यस्थी करून रोजगाराबाबत मार्ग काढावा अशी माझी सर्व प्रकल्पग्रस्तांच्या वतीने विनंती आहे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, स्थानिकांना प्रकल्पामध्ये नौकरी देताना प्राधान्य देण्यात येईल. पुढील तीन महिन्यांमध्ये गावकऱ्यांसोबत चर्चा करून स्थानिक बेरोजगारांची यादी तयार करून रोजगाराबाबत चर्चा करण्यात येईल.<br><br>मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, कंपनीने सरपंचांसोबत एक समिती स्थापन करावी व रोजगाराबाबतच्या समस्येवर तात्काळ काम सुरू करावे. कंपनीला याबाबत सांगण्यात आले आहे व याबात उचित कार्यवाही करण्यात येईल. |

११) **श्री. मधुकर रामचंद्र सावरकर, तालुका अध्यक्ष, भाजपा किसान आघाडी, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनीसोबत जिल्हाधिकारी कार्यालय तसेच तहसिल कार्यालयामध्ये विविध बैठका पार पडल्या आहेत. त्यामध्ये आमचे म्हणणे असे होते की कंपनीने शेतकऱ्यांसोबत चर्चा करावी. स्थानिक शेतकरी व गावकरी कंपनीला सहकार्य करण्यास तयार आहेत परंतु कंपनी हेतुपुरस्परपणे दुर्लक्ष करत आहे. कंपनीने शेतकऱ्यांसोबत नौकरीविषयक करार करावा. तसेच २.५ एकर प्रमाणे नौकरी द्यावी. एखाद्या शेतकऱ्याकडे जर १० एकर शेती असेल तर त्या शेतकऱ्याला ४ नौकऱ्या देण्यात याव्या. याबाबत कंपनी काहीच बोलत नाही. कर्नाटक एम्टा प्रमाणे येथे देखील कंत्राटादाराद्वारे नौकरी देण्यात येईल व फसवणूक करण्यात येईल. कंपनीने नौकरी विषयक सविस्तर माहिती द्यावी. कंपनीने करार केल्याशिवाय पुढील कार्यवाही करू नये अन्यथा याचा उद्रेक होईल. संरक्षण भिंतीचे काम करताना स्थानिक ठेकेदार असताना देखील चंद्रपूरच्या ठेकेदाराला काम दिले. नौकरी विषयक करार होत पर्यंत कंपनीने त्यांचे काम बंद ठेवावे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, स्थानिकांना प्रकल्पामध्ये नौकरी देताना प्राधान्य देण्यात येईल. पुढील तीन महिन्यांमध्ये गावकऱ्यांसोबत चर्चा करून स्थानिक बेरोजगारांची यादी तयार करून रोजगाराबाबत चर्चा करण्यात येईल.<br><br>मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, कंपनीने सरपंचांसोबत एक समिती स्थापन करावी व रोजगाराबाबतच्या समस्येवर तात्काळ काम सुरू करावे. |

१२) **श्री. मधुसुदन रूंगठा, अध्यक्ष, एमआयडीसी इंडस्ट्री असोसिएशन, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | विदर्भातील नागरीक शिक्षणासाठी बाहेर जातात. या ठिकाणी वर्षानुवर्षे उद्योग आलेले नाहीत. मा. मुख्यमंत्री यांच्या प्रयत्नांतून येथे उद्योग येत आहेत. चंद्रपूर जिल्ह्याला नक्षलग्रस्त, आदिवासी व मागासलेला जिल्हा म्हणून ओळखले जात होते. जिल्ह्यातील व राज्यातील लोकप्रतिनिधींना वारंवार | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, स्थानिकांना प्रकल्पामध्ये नौकरी देताना प्राधान्य देण्यात येईल. पुढील तीन महिन्यांमध्ये गावकऱ्यांसोबत चर्चा करून स्थानिक बेरोजगारांची यादी तयार करून रोजगाराबाबत चर्चा करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | विनंती करण्यात येत होती की आमच्या जिल्ह्यात उद्योग उभारण्याकरिता प्रयत्न करण्यात यावे. स्थानिकांच्या समस्यांचे निराकरण होणे गरजेचे आहे. मा. मुख्यमंत्र्यांनी दावोस येथे जाऊन या क्षेत्रात उद्योग येण्याकरिता करार केले. मा. मुख्यमंत्री यांनी स्थानिकांच्या विकासाकरिता मानसिकता तयार केली. आज विदर्भात जवळपास रू. ३००० कोटींची गुंतवणूक करण्यात येत आहे. येथे टाटा, बिरला, अडाणी सारखे उद्योग समूह गुंतवणूक करण्यास तयार आहेत. मा. पंतप्रधान यांच्या हस्ते मे. निप्पॉन डेन्ड्रो प्रकल्पाचे भूमिपूजन करण्यात आले होते. परंतु त्या प्रकल्पाचे पुढे काही झाले नाही. स्थानिक शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नूकसान झाले. सदर जनसुनावणीमध्ये एमआडीसीच्या अधिकाऱ्यांची उपस्थिती गरजेची होती कारण त्यांनी जागा संपादित केली होती. शेतकऱ्यांच्या समस्यांबाबत मा. मुख्यमंत्री यांच्या सोबत चर्चा व्हायला पाहिजे होती. कंपनी इतर ठिकाणी गुंतवणूक न करता भद्रावतीमध्ये गुंतवणूक करत आहे. स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांमध्ये विदर्भात खूप कमी प्रकल्प आले. येथे महाजेन्को, वे.को.लि. सारखे फक्त शासकीय प्रकल्प आले. या प्रकल्पांमध्ये बाहेरच्या लोकांना त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनूसार प्राधान्य देण्यात आले. स्थानिकांच्या विकासाकरिता स्थानिक गुंतवणूकदार यायला पाहिजे. त्यामुळे स्थानिकांना रोजगार प्राप्त होईल. कंपनी, स्थानिक प्रशासन व गावकरी यांच्यामध्ये चर्चा व्हायला पाहिजे व समस्या सोडविण्यात याव्यात. माझी मा. जिल्हाधिकारी यांच्यासोबत देखील जिल्ह्यातील नागरीकांना नूकसान भरपाई व रोजगाराच्या संधी मिळण्याबाबत वेळोवेळी चर्चा होत असते. कंपनी स्थानिकांच्या विरोधाला जुमानून कार्यान्वित होऊ शकत नाही. निप्पॉन डेन्ड्रा प्रकल्प रखडल्यामुळे स्थानिकांचे मोठ्या प्रमाणात हाल झाले. स्थानिकांच्या दोन पिढ्या गेल्या परंतु त्यांच्या प्रश्नांचे समाधान झाले नाही. मा. मुख्यमंत्र्यांनी सांगितले की या ठिकाणी दोन नवीन प्रकल्प येणार आहे. या जमीनीव्यतिरिक्त | |

| | | |
|---|---|---|
| | उर्वरित जमीनीवर आणखी एक प्रकल्प येण्याची शक्यता आहे. स्थानिक शेतकऱ्यांना त्यांच्या जमीनीचा मोबदला मिळत नसल्याची स्थिती निर्माण झाली आहे. प्रकल्प प्रवर्तकांनी ठरवले तर त्यांचे उत्पादन चीन सारख्या देशात निर्यात करून त्यांनी प्रसिद्धी कमाविली असती परंतु त्यांनी भद्रावती मध्ये गुंतवणूक करण्याचे ठरविले. तसेच त्यांनी स्थानिकांसोबत काम करून त्यांचा विकास करण्याचे योजिले आहे. या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात खनिज संपत्ती असल्यामुळे येथे उद्योग येणे गरजेचे आहे. लोह खनिजसाठा मिळाल्यामुळे या क्षेत्रात उद्योगांची संख्या वाढत आहे. लॉयड मेटल्स सारख्या उद्योगाने लोह खनिज उत्खनन करण्याकरिता २८ वर्ष वाट पाहिली त्यामुळे येथे औद्योगिकीकरण होण्यास सुरूवात झाली आहे. माझी स्थानिकांना विनंती आहे की त्यांनी कंपनीसोबत चर्चा करावी गुंतवणूकीकरिता वातावरण तयार करावे. भद्रावती व वरोरा शहरासारखा विकास या क्षेत्रात कुठेही होऊ शकत नाही. आज आमच्या शहरातील युवक नौकरीकरिता व शिक्षणाकरिता मोठ्या शहरात गेले व बेरोजगार झाले. मा. शरद पवारजी यांच्या सोबत झालेल्या चर्चेदरम्यान विदर्भातील बहुतांश युवक पुणे येथे रोजगारासाठी आल्याचे कळले. सदर विस्थापन थांबविण्याकरिता या प्रकल्पासारखे आणखी प्रकल्प या क्षेत्रा येणे अत्यंत गरजेचे आहे. जेणेकरून स्थानिक युवकांना बाहेर जाण्याची गरज पडणार नाही. | |

**१३) श्री. सुनंदा रेड्डी, पर्यावरणवादी, हैदराबाद:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | तुमच्या पर्यावरण सल्लागाराने वायु, जल व जमीनीचे चांगल्या प्रकारे बेसलाईन सर्वेक्षण केले आहे. माझी विनंती आहे की, त्यांनी आरोग्य विषयक, शेती विषयक व भूजल पातळी संदर्भात सर्वेक्षण करावे. पावसाच्या पाण्याचे योग्य नियोजन करण्याकरिता | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, आपल्या मुद्यांची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | रेनवॉटर हार्वेस्टींग प्रणाली बसवावी जेणेकरून भूजलाची पातळी कमी होणार नाही. परिसरातील गावांमध्ये वृक्षारोपण करावे व रस्त्याच्या कडेला देखील फळ झाडांची लागवण करावी. रोजगारामध्ये स्थानिक सुशिक्षीत युवकांना प्राधान्य द्यावे. तसेच स्थानिकांमध्ये कुशलता वाढविण्याकरिता कौशल्य विकास कार्यक्रम राबवावा. सीएसआर निधीबाबत ग्रामपंचायतींसोबत चर्चा करून विकास कामे करण्यात यावी. स्थानिकांसाठी आरोग्य शिबीरे घेण्यात यावी. गरीबांसाठी प्राथमिक शिक्षणाची सुविधा पूरविण्यात यावी. कंपनीने स्थानिकांच्या समस्या सोडवाव्या. | |

**१४)श्री. महेंद्र भोयर, सरपंच, ग्रामपंचायत कोच्ची-घोनाड, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनीची सर्वात मोठी चुक झाली की त्यांनी बाहेरच्या व्यक्तिला रोजगार दिला. कंपनीने प्रकल्पग्रस्त गावांमध्ये कोणत्याही प्रकारचे सर्वेक्षण केले नाही. कंपनीला विनंती आहे की त्यांनी स्थानिक गावाकऱ्यांच्या आरोग्यावर आपल्या प्रदूषणामुळे कोणताही परिणाम होणार नाही याची हमी घ्यावी. या क्षेत्राचे तापमान ४८ अंशांपर्यंत आहे. तापमान वाढणार नाही याची हमी कंपनीने घ्यावी. तसेच आपल्या कंपनीमुळे प्रदूषणात देखील वाढ होणार नाही याची हमी घ्यावी. उत्पादन केलेल्या मालाची व कच्च्या मालाची वाहतूक कोणत्या मार्गाचा वापर होणार आहे याची माहिती देण्यात यावी. पाणी कुठून घेणार आहात. एमआयडीसी गावातील पाण्याच्या स्त्रोतांमधून कंपनीला पाण्याची सुविधा पूरविणार असेल तर आमचा विरोध आहे. कंपनीने सांगितल्याप्रमाणे सांडपाण्याचे नियोजन करण्यात यावे अन्यथा ग्रामपंचायतीला व प्रशासनाला कंपनी बंद करण्याचे अधिकार देण्यात यावा. वाहतूकीमुळे शेतपिकांचे नूकसान होणार नाही याची हमी कंपनीने | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सादरीकरणादरम्यान सांगितल्याप्रमाणे रस्ते मार्गाद्वारे मालाची वाहतूक करण्यात येईल व योग्य त्या प्रदूषण नियंत्रण उपाययोजना करण्यात येईल. तसेच रस्त्यांच्या विकासासाठी एमआयडीसी सोबत चर्चा सुरू आहे. या परिसरात पूल बांधण्याबाबत देखील एमआयडीसीसोबत चर्चा सुरू आहे. एमआयडीसीतर्फे पाण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे. |

| | | |
|---|---|---|
| | घ्यावी व तसे झाल्यास कंपनीने नूकसान भरपाई द्यावी. प्रदूषणाबाबत संबंधित विभागाने गावांमध्ये जाऊन गावकऱ्यांच्या समस्या जाणून घ्याव्या. जोपर्यंत कंपनी प्रदूषण विषयक उपाययोजना व इतर बाबींबाबत लेखी आश्वासन देत नाही तोपर्यंत प्रदूषण विभागाने कंपनीला परवानगी देऊ नये ही आमची विनंती आहे. | |

**१५) श्री. विठ्ठल कवडु पिंपळशेंडे, तेलवासा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनी वर्धा नदीतून पाणी उपसा करणार आहे. वर्धा नदी लगत माझी १६५/२ ची जागा खरेदी करून ७/१२ खारीज करण्यात आला आहे. तसेच मला मोबदला देण्यात आला नाही. मला मोबदला कोण देणार याची माहिती मा. जिल्हाधिकारी साहेबांनी द्यावी. अन्यथा मी माझ्या शेतातून पाईपलाईन टाकू देणार नाही. १ एकर २ आर शेतीची जागा संपादित करण्यात आली आहे. रस्त्याच्या बांधकामामध्ये देखील माझी जमीन गेलेली आहे त्याचा मोबदला देखील मिळालेला नाही. तसेच भद्रावती ते वणी मार्ग तयार होत असताना देखील माझी जमीन अधिग्रहीत करण्यात आली आहे. त्याचा देखील मोबदला देण्यात आला नाही. शासन शेतकऱ्यांवर अन्याय करत आहे. भद्रावतीच्या तहसिलदारांसोबत भेट झाली परंतु त्यांचेकडून समाधानकारक उत्तर मिळाले नाही. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सादरीकरणादरम्यान सांगितल्याप्रमाणे रस्ते मार्गाद्वारे मालाची वाहतूक करण्यात येईल व योग्य त्या प्रदूषण नियंत्रण उपाययोजना करण्यात येईल. तसेच रस्त्यांच्या विकासासाठी एमआयडीसी सोबत चर्चा सुरू आहे. या परिसरात पूल बांधण्याबाबत देखील एमआयडीसीसोबत चर्चा सुरू आहे. एमआयडीसीतर्फे पाण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे.<br><br>मा. अध्यक्ष पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपले निवेदन तहसिदार यांच्याकडे देण्यात यावे. त्यावर पुढील कार्यवाही करण्यात येईल. |

**१६) श्री. वतन लोणे, पत्रकार दैनिक पुण्यनगरी, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | या प्रकल्पाच्या जागेवर सुरूवातीला निप्पॉन डेन्ड्रो हा प्रकल्प येणार होता. ३० वर्षांपासून स्थानिकांचा संघर्ष सुरू होता. खूप मोठ्या संघर्षानंतर भद्रावती तालुक्यात हा प्रकल्प येत आहे. याप्रकल्पामुळे स्थानिक बेरोजगारीची समस्या सोडवण्यास मदत होईल अशी | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, आपल्या मुद्यांची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | आशा आहे. सदर प्रकल्पाची गुंतवणूक पाहता हा प्रकल्प भद्रावती तालुक्यासाठी फायदेशीर ठरणार असल्याचे दिसत आहे. कंपनीला विनंती आहे की त्यांना स्थानिक प्रकल्पग्रस्त, शेतकरी व सुशिक्षित बेरोजगारांना त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनूसार रोजगार द्यावा. | |

**१७) श्री. मुनेश्वर बापूरावजी बदखल, उप-सरपंच, ग्रामपंचायत ढोरवासा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | ३० वर्षापासून स्थानिक शेतकऱ्यांना न्याय मिळाला नाही. स्थानिक शेतकऱ्यांना न्याय मिळाला पाहिजे तसेव बेरोजगारांना रोजगार मिळाला पाहिजे. स्थानिकांना न्याय देणार नाही तोपर्यंत प्रकल्प कार्यान्वित होऊ देणार नाही. शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळणार आहे किंवा नाही याबाबत कंपनीने त्यांचे मत व्यक्त करावे. संरक्षण भिंत उभारण्याचे काम करणाऱ्या कंत्राटदाराला आम्ही भ्रमणध्वनीवरून विनंती केली की स्थानिकांना रोजगार द्या परंतु त्यांनी आमच्या मागणीकडे दुर्लक्ष केले. कंपनीने रोजगाराबाबत लेखी स्वरूपात आश्वासन द्यावे. अरविंदो कंपनीमधील स्थानिकांना नौकरी वरून काढण्यात आले. परंतु बाहेरील ६०-७० व्यक्तिंना नौकरीवरून काढण्यात आले नाही. तशा प्रकारचा अन्याय या प्रकल्पामध्ये होता कामा नये. कंपनीने स्थानिकांच्या समस्यांबाबत लेखी आश्वासन द्यावे तरच कंपनीचे समर्थन करतो. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, मोबदल्याची बाब शासनाच्या अखत्यारीत येते. त्याबाबत आम्ही टिप्पणी करणे योग्य नाही. रोजगारामध्ये स्थानिकांना प्राधान्य देण्यात येईल याकरिता आम्ही बांधील आहोत. शेतकऱ्यांच्या मोबदल्याची बाब कंपनीच्या अखत्यारीत येत नाही. कंपनीने एमआयडीसीकडून जागा घेतली आहे व त्याचे रीतसर शुल्क अदा करण्यात आले आहे. शेतकऱ्यांनी मोबदल्याबाबत शासनाकडे दाद मागावी. स्थानिकांमध्ये कौशल्याचा विकास करून त्यांना रोजगार देण्यात येईल. प्रकल्पग्रस्त गावातील सरपंचांसोबत एक समिती तयार करण्यात येईल व त्यानूसार स्थानिकांना रोजगार उपलब्ध करण्यात येईल. आपणांस विनंती आहे की आपण पुढील ६ महिने संयम ठेवावा. कंपनीतर्फे प्रथम बेरोजगारांना त्यांच्या कौशल्याबाबत विचारण्यात येईल व त्यानंतरच त्यांना रोजगार देण्यात येईल. ०३ महिन्यांनंतर सर्वासोबत चर्चा करण्यात येईल व सर्वेक्षण करण्यात येईल. त्यानूसार शैक्षणिक अर्हता व कौशल्याचा विचार करून रोजगार देण्यात येईल. तसेच स्थानिक विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देखील देण्यात येईल. |

## १८) श्रीमती धानीबाई मारूती माथनकर, गौराळा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | या परिसरात पडीक जमीनी आहेत. त्या जमीनीवर शेती करायची किंवा कसे याबाबत माहिती देण्यात यावी. यावर्षी आमचा उदर्निर्वाह कसा करायचा हा प्रश्न निर्माण झाला आहे. कंपनीने वेतन सुरू करावे किंवा तात्काळ स्थानिकांना रोजगार द्यावा. आम्ही स्थानिकांनी आंदोलन करून देखील एकाही लोकप्रतिनिधीने त्याकडे लक्ष दिल नाही. कंपनीने स्थानिकांना रू. २००००/- प्रमाणे वेतन सुरू करावे ज्यामुळे आमच्या उदर्निर्वाहाचा प्रश्न सुटणार. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, जनसुनावणी झाल्याच्या ०३ महिन्यांनंतर सर्वासोबत चर्चा करण्यात येईल व सर्वेक्षण करण्यात येईल. त्यानूसार शैक्षणिक अर्हता व कौशल्याचा विचार करून रोजगार देण्यात येईल. ज्या युवकांमध्ये कौशल्याची कमतरता आहे अशा युवकांना कौशल्य विकास प्रशिक्षण देण्यात येईल व रोजगार देण्यात येईल. |

## १९) श्री. प्रफुल बट्टी, माजी अध्यक्ष, भद्रावती नगर परिषद, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | भद्रावती नगर परिषदेने भद्रावती शहराकरिता २४ तास पिण्याच्या पाण्याची सुविधा पूरविण्याकरिता एक्सप्रेस फिडर लाईन टाकलेली आहे. सदर फिडर लाईनचे कोणत्याही प्रकारचे नूकसान आपल्या प्रकल्पामुळे होणार नाही याची खात्री कंपनीने घ्यावी. ऑर्डनन्स फॅक्ट्री गोट्यापासून शेवटपर्यंत संरक्षण भिंत बांधण्याची परवानगी देत नाही. ऑर्डनन्स फॅक्ट्रीकडून आपणांस मान्यता मिळाली आहे किंवा कसे याबाबत माहिती द्यावी. कंपनीने भद्रावती नगर परिषदेला कोणत्यही प्रकारची माहिती दिलेली नाही. कंपनीतर्फे सीएसआर निधीचा योग्य तो वापर करण्यात येत नाही. कंपनीने प्रकल्पबाधित ग्रामपंचायतींना सीएसआर निधीचे योग्य ते वाटप करावे व प्रकल्पग्रस्त गावांमध्ये सर्व प्रकारच्या सोई सुविधा पूरवाव्या. तसेच याबाबत सर्व प्रकल्पग्रस्त ग्रामपंचायतींसोबत करार करण्यात यावा. भद्रावती नगर परिषदेच्या फिडर लाईनचे नूकसान होणार नाही याची हमी कंपनीने द्यावी. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, भद्रावती नगर परिषदेच्या फिडर लाईनचे नूकसान होणार नाही याची आम्ही हमी देतो. तसेच ग्रामपंचायतींना पाणी उपसा करण्याच्या ठिकाणांची माहिती देण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | भद्रावती नगर परिषदेद्वारे वर्धा नदीतून पाणी उपसा करण्यात येते. या संदर्भात दुसऱ्या योजनेचे काम प्रगतीपथावर आहे. कंपनी त्यांच्या उपयोगाकरिता वर्धा नदीतून पाणी कोणत्या आरक्षित ठिकाणाहून घेणार आहे याची माहिती कंपनीने भद्रावती नगर परिषदेला द्यावी. कारण जल जीवन मिशनच्या माध्यमातून प्रत्येक गाव/शहराला त्या क्षेत्रातील नदीतून उपसा करून पुरवठा करण्यात येणार आहे. यासंबंधी कंपनीने सर्व ग्रामपंचायतींना पाणी उपसा करण्याच्या ठिकाणाची माहिती उपलब्ध करून द्यावी. | |

## २०) श्री. अजहर अहमद खान, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सदर कंपनीने स्थानिकांना रोजगार द्यावा ही माझी मागणी आहे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, स्थानिकांना रोजगारात प्राधान्य देण्यात येईल. |

## २१) श्री. अनुप सुधाकर खुटेमाटे, पिपरी, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आपला चंद्रपूर जिल्हा आधीच उष्ण जिल्हा आहे व या प्रकल्पामुळे उष्णतेत आणखी वाढ होणार आहे. कंपनीच्या प्रदूषणामुळे शहराच्या उष्णतेमध्ये किती वाढ होणार आहे याची माहिती कंपनीने द्यावी. कंपनीच्या प्रदूषणामुळे स्थानिकांवर परिणाम झाल्यास या परिसरात सुसज्जित दवाखान्याची सुविधा उपलब्ध होणार आहे काय? कंपनीमुळे प्रदूषण वाढणार असल्याने त्याचा विपरीत परिणाम स्थानिकांच्या आरोग्यावर होणार आहे व त्याकरिता कंपनीने या परिसरात सुसज्जित दवाखान्याची सुविधा उपलब्ध करून दिली पाहिजे. दि. २४/०४/२०२४ रोजी पहिली बैठक पार पडली. त्यामध्ये शेतकऱ्यांना सानुग्रह अनुदान देण्यात यावे व प्रति हेक्टर नौकरी या प्रकारच्या मागण्या ठेवण्यात आल्या. जवळपास एक | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, परिसरातील हवा, जल व ध्वनीचे सर्वेक्षण करण्यात आले आहेत व शासनाच्या नियमाप्रमाणे सर्व मानक विहीत मर्यादेत आढळतात. कंपनीच्या प्रदूषणामुळे स्थानिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होणार नाही. उपकरणांमध्ये इंटरलॉकची सुविधा असते. उपकरणांमध्ये काही त्रुटी आढळल्यास उत्पादन प्रक्रिया आपोआप पूर्णपणे बंद होते. प्रकल्प कायान्वित झाल्यानंतर प्रदूषणाचा त्रास होणार नाही याबाबत कंपनीतर्फे काळजी घेण्यात येईल.<br><br>मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, स्थानिकांच्या |

| | | |
|---|---|---|
| | वर्ष लोटूनही स्थानिकांच्या मागण्या प्रशासनातर्फे पूर्ण केल्या जात नाहीत. स्थानिकांच्या मागण्याबाबत तोडगा निघायला आणखी किती कालावधी लागणार? एमआयडीसी मध्ये सदर प्रकल्प कार्यान्वित होणार असल्याने तेथे दवाखान्याची सुविधा उपलब्ध असायलाच पाहिजे. कंपनी त्यांच्या उपयोगाकरिता पाणी कुठून उपसा करणार आहे याबाबत माहिती दिलेली नाही. या परिसरात सिंचनावर आधारित शेतकरी आहेत. सदर प्रकल्पामुळे शेतकऱ्यांचे नूकसान झाल्यास कंपनी शेतकऱ्यांना नूकसान भरपाई देणार आहे काय? तसेच कंपनी वर्धा नदीवर बॅरेज बांधणार आहे काय? पाण्याच्या उपलब्धतेबाबत प्रत्येक गावामध्ये ग्रामसभा घेण्यात यावी. कंपनीच्या वाहतूकीमुळे परिसरात अपघातांचे प्रमाण वाढणार आहेत. तसेच ऑर्डनन्स फॅक्ट्रीच्या पाईपलाईनमुळे रस्त्याच्या चौपदरीचे काम सद्य:स्थितीत करता येणार नाही. तसेच वाहतूकीमुळे रस्त्यालगतच्या शेतीचे नूकसान होणार असल्याने नूकसान भरपाईची तरतूद करण्यात आली आहे किंवा कसे याबाबत माहिती देण्यात यावी. पर्यावरण विषयक जनसुनावण्या शासनाच्या नियमानूसारच घेण्यात येतात. परंतु प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर उद्भवणाऱ्या समस्यांची प्रशासन देखील दखल घेत नाही. प्रकल्प प्रवर्तक मुद्यांशी संबंधित समाधानकारक उत्तर देण्यास असमर्थ दिसत आहे. याचा निर्णय झाल्यानंतर प्रकल्पाला पर्यावरणीय मंजूरी मिळणार काय? शेतकऱ्यांच्या मागण्या पूर्ण झाल्यानंतर प्रकल्पाच्या कामाला सुरूवात होईल काय? या क्षेत्रात किती झाडे लावण्यात येतील? | मागण्यांबाबत शासनातर्फे विहीत वेळेत तोडगा काढण्यात येईल. कंपनीने रोजगार व आरोग्याबाबत उत्तर दिले आहे. कंपनीने परिसरात रूग्णवाहिका किंवा दवाखान्याची सुविधा उपलब्ध करून द्यावी जेणेकरून आपात्कालीन परिस्थितीमध्ये उपयोगात येतील. पाण्याच्या उपयोगाबाबत तज्ञ समितीच्या निर्देशांचे पालन करावे लागतात. सर्व प्रथम पाण्याची उपलब्धता ही अनुक्रमे पिण्यासाठी, सिंचनासाठी व सर्वात शेवटी औद्योगिक कारणाकरिता असते. पिण्याकरिता व सिंचनाकरिता पाणी उपलब्ध करून दिल्यानंतर जर औद्योगिक प्रायोजनाकरिता पाणी शिल्लक राहिल्यास औद्योगिक कारणास्तव पाणी देण्यात येते.<br><br>प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, कंपनीतर्फे एमआयडीसीकडे पाण्याच्या उपलब्धतेबाबत अर्ज केला जाणार व पाण्याची उपलब्धता केली जाणार. पाणी वाटप शासनाच्या नियमाप्रमाणे वेगवेगळ्या घटकांना करण्यात येते. शासकीय नियमांच्या आधिन राहून सर्व गोष्टी करण्यात येतील. मागील ३० वर्षांत या क्षेत्रात प्रकल्प आले नाहीत. सदर प्रकल्प कार्यान्वित करताना त्या अनुषंगाने विकासकामे करण्यात येतील. त्याबाबत शासन दरबारी बऱ्याच विषयांवर चर्चा सुरू आहेत. सद्य:स्थितीत रस्ते अरूंद आहेत परंतु वाहतूक वाढल्यानंतर रस्त्यांचे चौपदरीकरण करणे गरजेचे होईल. याबाबत शासनासोबत चर्चा सुरू असून महत्त्वाच्या पायाभूत सुविधांच्या विकासाबाबत योग्य त्या उपाययोजना करण्यात येतील.<br><br>मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, जनसुनावणी दरम्यान लोकप्रतिनिधींनी किंवा नागरीकांनी |

| | | |
|---|---|---|
| | | उपस्थित केलेल्या मुद्यांवर प्रकल्प प्रवर्तकांनी समाधानकारक उत्तरे दिली किंवा नाही याचे जनसुनावणीच्या ईतिवृत्तामध्ये नोंद घेण्यात येत आहे व त्यावर शासनातर्फे योग्य तो निर्णय घेण्यात येईल. पर्यावरण विषयक मंजूरी जनसुनावणीच्या ईतिवृत्तानूसार घेण्यात येते. स्थानिक शेतकऱ्यांच्या मागण्यांच्या सद्य:स्थितीबाबत जनसुनावणीदरम्यान सांगणे अशक्य आहे. एमआयडीसीने जमीन अधिग्रहीत केलेली असून ती प्रकल्प प्रवर्तकांना दिलेली आहे व कंपनीचे काम सुरू आहे. सदर जनसुनावणी पर्यावरण विषयक असल्याने जमीनीच्या प्रश्नांबाबत उत्तर देणे शक्य नाही.<br><br>प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सादरीकरणादरम्यान सांगितल्याप्रमाणे जवळपास ५०,००० झाडे लावण्यात येतील. |

**२२) श्री. नरेश लक्ष्मण मत्ते, भद्रावती, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | स्थानिक शेतकऱ्यांनी व नागरीकांनी उपस्थित केलेले सर्व मुद्दे योग्य आहेत. सदर जनसुनावणी प्रदूषणाविषयक होती व त्यामध्ये रस्त्यांचा वापर, विविध प्रकारचे होणारे प्रदूषण तसेच परिसरातील शेतकऱ्यांवर व गावांवर होणारा परिणाम याबाबत प्रकल्प प्रवर्तकांतर्फे समाधानकारक उत्तरे देण्यात येत नाही. परंतु संबंधित ग्रामपंचायतींना, नगर परिषदेला देण्यात यावी. तसेच याबाबत आणखी बैठक घेऊन त्याबाबत समाधानकारक उत्तरे देण्यात यावी. प्रकल्पांतर्गत क्षेत्रापैकी किती क्षेत्रात हरीत पट्टा विकसित करण्यात येणार आहे? कंपनीच्या उत्पादनाच्या तुलनेमध्ये हरीत पट्टा खूप कमी प्रमाणात होणार आहे. स्टील प्लांट मुळे प्रदूषणात मोठ्या | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सर्व मानक नियमाप्रमाणे विहीत मर्यादेत ठेवण्यात येतील व त्या संबंधि फलक लावण्यात येईल. शासकीय नियमांपेक्षा अधिक प्रमाणात वृक्ष लागवड करण्याचे प्रस्तावित आहे व त्यामध्ये वाढ करण्याचा प्रयत्न करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | प्रमाणात वाढ होणार व सल्फरची विल्हेवाट कशा प्रकारे लावण्यात येईल याची माहिती देण्यात यावी. स्टील प्लांटमुळे तापमानात वाढ होणार आहे. चंद्रपूर जिल्ह्याचे तापमान ४६ अंश सेल्शिअस पेक्षा जास्त असते. आपण सांगितलेले ३६ अंश सेल्शिअस तापमान फेब्रुवारी महिन्यात असते. कंपनीने तापमान कसे नियंत्रणात ठेवण्यात येईल याबाबत प्रदूषण नियंत्रण मंडळाला माहिती द्यावी. कंपनीने सर्व मानक विहीत मर्यादेत राहतील याबाबत खात्री द्यावी. तसेच त्याचे फलक प्रथम दर्शनी भागात लावण्यात यावे. हरीत पट्ट्याच्या क्षेत्रात वाढ करण्यात यावी व झाडांचे संगोपन करण्यात यावे. | |

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही सूचना, आक्षेप असल्यास त्या उपस्थित करण्याची विनंती केली. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता.

बैठकीचा समारोप करताना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी सूचना, आक्षेप नोंदविल्याबद्दल स्थानिकांचे व त्याचप्रमाणे सर्वांचे आभार मानले व जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

मा. अध्यक्षांचे आभार मानून जनसुनावणी ही संस्थगित करण्यात आली.

प्राप्त झालेले ०९ सूचना, आक्षेप सोबत जोडलेले आहेत.

| | | |
|---|---|---|
| **(उमाशंकर भादुले)**<br>समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ, चंद्रपूर | **(संजय दे. पाटील)**<br>सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ, चंद्रपूर | **(डॉ. नितीन रा. व्यवहारे)**<br>अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा अपर जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर, जिल्हा चंद्रपूर. |